ePaper
वर्ष - 9 । अंक -43 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | रविवार, दि. 5 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अमित शाहांचा शिर्डी मुक्काम; CM, DCM अर्धा डझन मंत्रीही सोबत!




### आतील पानांत

- रोहितला कॅप्टन पदावरून हटवलं
- अजित आगरकरांचा मास्टरस्ट्रोक!
- पाकिस्तानची नवी खेळी!
- चेंगराचेंगरी प्रकरणात विजयला अटक?


**पुण्याच्या राजकारणात भूकंप** | वडगावशेरी मतदारसंघात खळबळ

# आमदार बापूसाहेब पठारे यांना मारहाण!

## लोहगाव परिसरात आयोजित एका कार्यक्रमादरम्यान प्रकार

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पुणे शहरातील वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांना मारहाण झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी रात्री उशीरा घडली आहे. लोहगाव परिसरात आयोजित एका कार्यक्रमादरम्यान झालेल्या या प्रकाराने संपूर्ण पुण्यात आणि विशेषतः वडगावशेरी मतदारसंघात मोठी खळबळ उडाली आहे.**




आमदारांवर झालेल्या या मारहाणीच्या घटनेने वडगावशेरीतच नव्हे तर संपूर्ण पुणे राजकारणात चांगलाच भूकंप घडवला आहे. महाविकास आघाडीतील एकमेव आमदारावर हल्ला होणे ही केवळ वैयक्तिक नव्हे, तर राजकीय घडामोडींना नवे वळण देणारी घटना ठरू शकते. आगामी काही दिवसांत या प्रकरणात नवे खुलासे होण्याची शक्यता असून, पोलिस तपासाच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, आमदार पठारे हे शनिवारी संध्याकाळी लोहगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या स्थानिक कार्यक्रमाला उपस्थित होते. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कार्यकर्त्यांशी त्यांचा वाद झाला. काही क्षणांतच हा वाद उग्र झाला आणि परिस्थितीने हाणामारीचे स्वरूप घेतले. उपस्थित काही कार्यकर्त्यांनी आमदार पठारे यांना ढकलाढकली करत मारहाण केल्याचे सांगण्यात येत आहे. या गोंधळात आमदार पठारे यांना किरकोळ दुखापत झाली असून, पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

### घटनेनंतर परिसरात तणाव

घटनेनंतर लोहगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. आमदार पठारे यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. सोशल मीडियावर काही तासांतच 'आमदारांना मारहाण' ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. समर्थकांनी नाराजी व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली आणि काही संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, नेमकी मारहाण कोणी व कोणत्या कारणामुळे केली याचा तपास सुरु आहे. स्थानिक पोलिसांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू केले आहे.

### पठारे यांची राजकीय पार्श्वभूमी

आमदार बापूसाहेब पठारे हे पुणे महानगरपालिकेतील अनुभवी नगरसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांनी महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना प्रशासनात आपली वेगळी छाप सोडली होती. वडगावशेरी मतदारसंघातून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावरून दोन वेळा विधानसभेची निवडणूक जिंकली आहे.२०१५ च्या विधानसभा निवडणुकीत मोदी लाटेमुळे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आणि काही काळ त्या पक्षात सक्रिय राहिले. मात्र, मागील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये प्रवेश केला. पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना वडगावशेरी मतदारसंघातून उमेदवारी दिली. या निवडणुकीत त्यांनी महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांचा पराभव करून पुन्हा विधानसभा गाठली.

### महाविकास आघाडीतील एकमेव आमदार

पुण्यातील वडगावशेरी मतदारसंघ हा राजकीयदृष्ट्या अत्यंत चर्चेत राहणारा परिसर आहे. या मतदारसंघात सत्ताधारी गट आणि विरोधी पक्ष यांच्यात सातत्याने संघर्षाचे वातावरण राहिले आहे. बापूसाहेब पठारे हे सध्या महाविकास आघाडीचे एकमेव आमदार असून, ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे या घटनेला राजकीय पार्श्वभूमी असल्याची चर्चा देखील रंगू लागली आहे.

### कार्यक्रमात अचानक तणाव

शनिवारी झालेल्या कार्यक्रमादरम्यान दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये आधी वादविवाद सुरू झाले. शब्दांचे वार वाढताच काही कार्यकर्त्यांनी उग्र भूमिका घेतली आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. उपस्थित लोकांनी मध्यस्थीचा प्रयत्न केला तरी काही वेळेतच हातघाई झाली. या गोंधळात आमदार पठारे यांना ढकलण्यात आले आणि त्यांना किरकोळ मार लागला. पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

### राजकीय वर्तुळात खळबळ

या घटनेनंतर पुण्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांनी या प्रकाराचा निषेध केला असून, काहींनी यामागे राजकीय वैमनस्य असल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तसेच काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी पोलिसांकडे घटनेचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दुसरीकडे, अजित पवार गटातील कार्यकर्त्यांनी मात्र या घटनेविषयी अद्याप अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. काही कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, "कार्यक्रमात झालेला वाद वैयक्तिक स्वरूपाचा होता, त्याला राजकीय रंग देऊ नये," अशी प्रतिक्रिया मिळाली.

### पोलिसांची भूमिका आणिपुढील कारवाई

पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली असून, सध्या संपूर्ण परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोहगाव पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारी स्वतः या प्रकरणाचा आढावा घेत आहेत.

पोलिस सूत्रांनी सांगितले की, "आमदारांना झालेल्या मारहाणीचा प्रकार अत्यंत गंभीर आहे. कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेणाऱ्यांना सोडले जाणार नाही. सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत आणि संबंधितांची चौकशी सुरू आहे."

### समर्थकांची वाढती गर्दी आणि संताप

आमदार पठारे यांच्या समर्थकांनी या घटनेनंतर मोठ्या संख्येने लोहगाव येथे धाव घेतली. काही वेळासाठी गर्दीमुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला होता. समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी संयम ठेवून परिस्थिती हाताळली आणि गर्दी पांगवली.

१२ प्रभागांमध्ये बदल

## अंतिम प्रभाग रचना जाहीर; आठ प्रभागांना नवीन नाव

# पालिकेच्या 12 प्रभागांमध्ये बदल

## अंतिम प्रभागरचना शनिवारी जाहीर

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचना शनिवारी जाहीर करण्यात आली आहे. १६५ नगरसेवकांसाठीच्या ४१ प्रभागांच्या प्रारूप रचनेवर आलेल्या पाच हजार ९२२ हरकतींपैकी १ हजार ३२९ हरकतींची पूर्णतः आणि ६९ हरकती अंशतः दखल घेत १२ प्रभागांमध्ये बदल करण्यात आला आहे. प्रभागांच्या नावांना हरकत घेण्यात आल्याने आठ प्रभागांच्या नावांमध्ये बदल करण्यात आला आहे.**



निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अंतिम प्रभागरचनेमध्ये प्रभाग क्रमांक १८ वानवडी-साळुंके विहार या प्रभागातील शिंदे वस्तीचा भाग प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा या प्रभागाला जोडण्यात आला आहे. प्रारूप रचनेमध्ये शिंदे वस्तीच्या रस्त्याने विभाजन झाले होते. प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा येथील मगरपट्टा सिटी रस्त्याच्या समोरील भाग हा प्रभाग क्रमांक १७ रामटेकडी-माळवाडी- वैदुवाडी याला जोडण्यात आला आहे.प्रभाग क्रमांक २० बिबवेवाडी- महेश सोसायटी या प्रभागातील के. के. मार्केट येथील पुण्याई नगर हा भाग प्रभाग क्रमांक ३८ बालाजी नगर-आंबेगाव- कात्रज या पाच सदस्य असलेल्या प्रभागाला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बुद्रुक-आंबेगावचा काही भाग देखील प्रभाग क्रमांक ३८ ला जोडण्यात आला आहे. कोळेवाडी, जांभूळवाडी हा भाग देखील याच प्रभागाला जोडण्यात आला आहे.प्रभाग क्रमांक ३८ ला इतर प्रभागांतील काही भाग जोडल्याने हा प्रभाग अधिक मोठा झाला होता. त्यामुळे बालाजीनगर-आंबेगाव-कात्रजमधील सुखसागरनगरचा भाग कमी करून तो अंतिम प्रभागाच्या रचनेत प्रभाग ३९ अप्पर सुपर – इंदिरानगरला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक १५ मांजरी बुद्रुक- केशवनगर-साडेसतरा नळीमधील थिटे वस्तीचा भाग प्रभाग क्रमांक ४ खराडी – वाघोलीला जोडला आहे. या प्रभागातून सर्वाधिक हरकती आणि सूचना नोंदविण्यात आल्या होत्या. सुनावणीसाठी या प्रभागातील नागरिकांनी उपस्थिती लावून थिटे वस्ती वगळण्याची भूमिका मांडली होती.प्रभाग क्रमांक १, ४, १४, १५, १७, १८, २०, २४, २७, ३४, ३८ आणि ३९ मध्ये बदल झाले आहेत. मध्यवर्ती पेठांमधील प्रभागांमध्ये बदल करण्यासाठी नागरिकांनी सूचना आणि हरकती नोंदविल्या होत्या. त्या अमान्य करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.महापालिकेच्या १६५ नगरसेवकांसाठीच्या ४१ प्रभागाच्या प्रारूप रचनेवर पाच हजार ९२२ हरकती, सूचना आल्या होत्या. यापैकी ४ हजार ५२४ हरकती अमान्य करण्यात आल्या. १ हजार ३२९ हरकती, सूचना पूर्णतः आणि ६९ हरकती अंशतः मान्य करण्यात आल्या.निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अंतिम प्रभागरचनेमध्ये प्रभाग क्रमांक १८ वानवडी- साळुंके विहार या प्रभागातील शिंदे वस्तीचा भाग प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा या प्रभागाला जोडण्यात आला आहे. प्रारूप रचनेमध्ये शिंदे वस्तीच्या रस्त्याने विभाजन झाले होते. प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा येथील मगरपट्टा सिटी रस्त्याच्या समोरील भाग हा प्रभाग क्रमांक १७ रामटेकडी- माळवाडी- वैदुवाडी याला जोडण्यात आला आहे.प्रभाग क्रमांक २० बिबवेवाडी- महेश सोसायटी या प्रभागातील के. के. मार्केट येथील पुण्याई नगर हा भाग प्रभाग क्रमांक ३८ बालाजी नगर-आंबेगाव- कात्रज या पाच सदस्य असलेल्या प्रभागाला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बुद्रुक-आंबेगावचा काही भाग देखील प्रभाग क्रमांक ३८ ला जोडण्यात आला आहे. कोळेवाडी, जांभूळवाडी हा भाग देखील याच प्रभागाला जोडण्यात आला आहे.

### ४,५२४ हरकती फेटाळल्या

प्रभाग क्रमांक ३८ ला इतर प्रभागांतील काही भाग जोडल्याने हा प्रभाग अधिक मोठा झाला होता. त्यामुळे बालाजीनगर-आंबेगाव- कात्रजमधील सुखसागरनगरचा भाग कमी करून तो अंतिम प्रभागाच्या रचनेत प्रभाग ३९ अप्पर सुपर – इंदिरानगरला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक १५ मांजरी बुद्रुक- केशवनगर-साडेसतरा नळीमधील थिटे वस्तीचा भाग प्रभाग क्रमांक ४ खराडी – वाघोलीला जोडला आहे.

# भाजपचे 'अमर प्रेम', इतरांचे 'लव्ह जिहाद' कसे?

## 'सौगाद-ए-मोदी'वरून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचा सवाल

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भाजपकडून 'सौगाद-ए-मोदी' चे वाटप करण्यात आले. भाजपने मुस्लिमांसाठी काही केले तर ते 'अमर प्रेम' आणि इतरांनी केले, तर 'लव्ह जिहाद, असे कसे होऊ शकते? असा सवाल शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. शिवसेना ही भाजपबरोबर होती, तेव्हा प्रखर हिंदुत्ववादी होती आणि काँग्रेसबरोबर गेल्यावर हिंदुत्व सोडले म्हणता.**



मग नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू हे हिंदुत्ववादी आहेत का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ठाकरे बोलत होते. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले यावेळी उपस्थित होते.ठाकरे म्हणाले, 'काँग्रेसबरोबर गेलो म्हणून शिवसेनेने हिंदुत्व सोडले, अशी ओरड भाजपकडून केली जाते. मग तुम्ही चंद्राबाबू नायडू, नितिश कुमार यांच्याबरोबर गेला, मग हे दोघे हिंदुत्ववादी आहेत का? ३२ लाख मुस्लीमांना 'सौगात-ए-मोदी'चे वाटप करण्यात आले. भाजपने मुस्लिमांसाठी काही केले तर ते 'अमर प्रेम' आणि इतरांनी केले, तर 'लव्ह जिहाद, असे कसे होऊ शकते?'शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मृत्यूबाबत माजी मंत्री रामदास कदम यांनी केलेल्या आरोपांबाबत उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारला असता, 'गद्दारांच्या प्रश्नांना उत्तर देत नाही' असे सांगत ठाकरे यांनी या विषयावर अधिक बोलणे टाळले.मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार आणि यांनी उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देऊन चूक केल्याचे म्हटले होते.

### 'गद्दारांना उत्तर देत नाही'

मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन चूक केल्याचे वाटते का? असे विचारण्यात आले असता, ठाकरे म्हणाले, 'चूक झाली असे वाटत नाही.पत्रकार म्हणून लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांची नावे घेतली जातात; पण ती पत्रकारिता आज राहिली आहे का? चुकीचे काम करणाऱ्या सरकारला 'डोके ठिकाणावर आहे का?' असा प्रश्न विचारण्याची हिंमत आहे का?

पिंपरी येथे मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय


तब्बल 22 अग्निशमन बंब उभे राहणार

# राज्यभरातील जवानांना प्रशिक्षण मिळणार!

## 100 अग्निशामक जवानांना एकाच वेळी प्रशिक्षण मिळण्याची व्यवस्था

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथे मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय व प्रबोधिनी उभारण्याचे काम सुरू झाले आहे. येथे तब्बल 22 अग्निशमन बंब उभे राहतील, इतके प्रशस्त पार्किंगसह जवानांसाठी (फायरमन) निवास व्यवस्था असणार आहे..येथे महापालिकेसह राज्यभरातील 100 अग्निशमन जवानांना प्रशिक्षण (ट्रेनिंग) देण्याची सुसज्ज व अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भविष्यात, शहरातून अनेक प्रशिक्षित जवान निर्माण होणार होतील.**



अग्निशमन विभागाचे मध्यवर्ती मुख्यालय वायसीएम रुग्णालयाजवळील संत तुकारामनगर येथे आहे. तेथील जागा अपुरी पडत असल्याने गांधीनगर, पिंपरी येथे नव्या प्रशस्त ठिकाणी मुख्यालय बांधण्यात येत आहे.

महिंद्रा कंपनीकडून 'आयटूआर' अंतर्गत मिळालेल्या 5.5 एकर जागेत हे मुख्यालय बांधण्यात येत आहे. इमारतीचा खर्च 126 कोटी 24 लाख रुपये इतका आहे. त्या खर्चास 21 जानेवारी 2025ला स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. कडून काम सुरू झाले असून, सध्या खोदकाम सुरू आहे.

आठ मजली प्रबोधिनी इमारत असणार आहे. तेथे जवानांना अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एकूण 100 जवानांसाठी निवास व्यवस्था असणार आहे. दोनशे आसन क्षमतेचे प्रेक्षागृह व 50 आसन क्षमतेचे सेमिनार रूम असणार आहे. कवायत व प्रशिक्षणासाठी मैदान असणार आहे. कार्यालय व कार्यशाळा असणार आहे.

संग्रहालयही असणार आहे. अग्निशमन बंबांसह बोट वाहनतळ, ट्रेनिंग रूम, युद्ध कक्ष, ऑपरेशनल स्टाफ एरिया रूम, रेकॉर्ड रूम, मनोरंजन क्षेत्र, तयारी कक्ष, थिएटर आदी सुविधा असणार आहे. सोबत 118 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असेल. एकूण 22 अग्निशमन बंब उभे करता येतील, अशी प्रशस्त पार्किंग असणार आहे. इतर वाहनांची दोन मजली पार्किंग व्यवस्था असेल. अग्निशमन विभागातील कर्मचारी त प्रशिक्षणार्थी जवानांसाठी 15 मजली निवासी इमारत असणार आहे. या प्रबोधिनीत महापालिकेसह राज्यभरातील जवानांना अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. आपत्तकालीन परिस्थिती जसे आग, भूकंप, पूर, भूस्खलन, अपघात, दुर्घटना अशा आप्तकालीन परिस्थितीचे अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी तज्ज्ञ आणि अनुभवी प्रशिक्षण व मार्गदर्शकही नेमले जाणार आहेत. या माध्यमातून भविष्यात पिंपरी-चिंचवडमधून असंख्य जवान तयार होतील. तसेच, महापालिकेच्या जवानांचीही कार्यक्षमता वाढणार आहे. त्यांना नवनवे तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात करता येईल, असा विश्वास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



> “ शहर झपाट्याने वाढत असून, चारही बाजूने दाट लोकवस्ती निर्माण होत आहे. शहरातील अग्निसुरक्षा व आपत्कालीन सेवा अधिक मजबूत करण्यावर महापालिकेकडून भर दिला आहे. महापालिकेची अग्निशमन यंत्रणा सक्षम करणे. जवानांना सातत्याने प्रशिक्षण देणे. जलद प्रतिसादासाठी केंद्रीकृत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या जात आहेत. ही अग्निशमन प्रशिक्षण अकादमी केवळ आमच्या कार्यक्षमतेत वाढ करणारी नाही, तर अग्निसुरक्षा प्रशिक्षणाचे केंद्र म्हणूनही उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांना अपघात कसे टाळावेत. जीव कसा वाचवावा याची माहिती मिळेल.
>
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड

# महावितरणच्या मोशी शाखा विभाजनाला “हिरवा कंदिल”

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; समाविष्ट गावांतील शाश्वत विकासावर शिक्कामोर्तब


| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाने (महावितरण) महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मोशी उपशाखेचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.**




भोसरी आणि परिसरातील वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. महावितरणचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मे-2025 मध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती. त्यानंतर विधानसभा अधिवेशनातही भाजपा महायुती सरकारचे लक्ष वेधले होते. त्याची फलश्रृती आता होताना दिसत आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 2014 नंतरच्या काळात समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी गती मिळाली. त्यामुळे 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला. परिणामी, वीज ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे महावितरण नवीन उपशाखा आणि


महावितरण
दिनांक 2 5 SEP 2025
क्र.मासं/मपुक 0 3 1 0 0 5
मपुक कार्यालयीन आदेश क्र.- ७७/२०२५
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कर्मचारी सेवाविनियम अनुसूची क्र.एक मधील अ.क्र."क + ख" व "ट" अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) व संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महावितरण यांनी खालील बाबींस मंजूरी दिली आहे.
१. पुणे परिमंडळातील गणेशखिंड शहर मंडलांतर्गत भोसरी विभागातील भोसरी-०२ उपविभागांतर्गत मोशी शाखा कार्यालयाचे विभाजन करुन नवनिर्मित बोऱ्हाडेवाडी शाखा कार्यालय निर्माण करण्यात येत आहे.
२. पुणे परिमंडळातील गणेशखिंड शहर मंडलांतर्गत भोसरी विभागातील भोसरी-०२ उपविभागांतर्गत मोशी शाखा कार्यालयाचे विभाजन करुन नवनिर्मित बोऱ्हाडेवाडी शाखा कार्यालयाचे नियंत्रण भोसरी-०२ उपविभागांतर्गत आणण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

मनुष्यबळ निर्मितीची आवश्यकता होती. भविष्यातील 25 ते 30 वर्षांचा विचार करुन नवीन शाखा निर्मिती करण्यात आली आहे. समाविष्ट गावांतील शाश्वत विकासावर या निमित्ताने शिक्कामोर्तब झाले आहे.

**बोऱ्हाडेवाडी नवीन उपशाखेची निर्मिती**

भोसरी उपविभागीय २ कार्यालय अंतर्गत मोशी शाखेचे विभाजन करण्याच्या प्रस्तावालाही महावितरण प्रशासनाने मान्यता दिली आहे. नवनिर्मित बो-हाडेवाडी शाखेमध्ये कर्मचारी व अधिकारी संख्या वाढणार आहे. त्यामुळे त्यामुळे बो-हाडेवाडी, बारणेवस्ती, गायकवाडवस्ती, नागेश्वरनगर, बोराटेवस्ती, संजयगांधी नगर, बनकर वस्ती भागातील वीज पुरवठा सुरळीत व अखंड ठेवण्यास मदत झाली आहे. या नवीन शाखेअंतर्गत अंदाजे ३० हजार ग्राहक संख्या आणि पुर्वीच्या मोशी शाखेअंतर्गत अंदाजे २५ ते ३० इतकी ग्राहक संख्या आहे. त्यामुळे शाखा विभाजनाचा प्रस्ताव ठेवला होता. त्याला मान्यता मिळाली आहे.

> “ शहराची वाढती लोकसंख्या आणि वीज ग्राहक यांचा विचार करता वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. वाढत्या वीज मागणीनुसार, वीज वितरण इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहोत. यापूर्वी इन्फ्रा-१ आणि इन्फ्रा-२ ची कामे सुरू झाली. त्यानंतर चऱ्होली शाखेचे विभाजन, भोसरी शाखेचे विभाजन आणि आता मोशी शाखेचे विभाजन करुन प्रशासन आणि यंत्रणेवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न आहे. मनुष्यबळ निर्मिती आणि RDSS योजनेतून निधीची उपलब्धता झाल्यामुळे वीज पुरवठा सक्षम करण्यास मदत होत आहे. प्रशासनाने आता मंजुर प्रस्तावानुसार कालबद्ध नियोजन करावे आणि कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



## भूमिका

# चिनी आव्हानामुळे भारताला संधी!

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लाओसमधील 'आग्नेय आशियाई संरक्षणमंत्री मंचा'च्या व्यासपीठावरून दोन संरक्षण करारांचा खास उल्लेख केला. हे करार ऑस्ट्रेलिया आणि जपानशी झालेले आहेत. पण यातून समविचारी आशियाई देशांशी भारताचे सुरक्षा सहकार्य विकसित करण्यास किती वाव आहे, हेही स्पष्ट होते.**

भारताच्या संरक्षण औद्योगिक तळाच्या आधुनिकीकरणाची तातडीची गरज पाहाता, आशियाई मित्रांसोबत संरक्षण जाळे तयार करणे ही भारतासाठी निकडीची बाब आहे.यापैकी, ऑस्ट्रेलियाशी झालेला करारामुळे भारतीय आणि ऑस्ट्रेलियन लष्करी विमानांमध्ये एअर-टू-एअर इंधन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा आहे. यामुळे दोन्ही हवाई दलांच्या कार्यक्षमतेला चालना मिळेल. तर काही दिवसांपूर्वी दिल्ली आणि टोकियोने भारतीय युद्धनौकांसाठी स्टेल्थ उपकरणांच्या संयुक्त उत्पादनावर सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. व्याप्ती मर्यादित असूनही, हे करार भारत आणि त्याच्या आशियाई भागीदारांनी प्रादेशिक सुरक्षा व्यवस्थेतील त्यांचे सामायिक हित लक्षात घेऊन पावले कशी टाकली पाहिजेत, याचे उदाहरण ठरतात. या भागातील प्रादेशिक वादांमध्ये चीनचा वाढता ठामपणा ही एक महत्त्वाची चिंताजनक बाब



आहे. भारतासह शेजारी राष्ट्रांसह विवादित सीमांवर अनेक वर्षे बेटकुळ्या दाखवत राहिलेला किंवा सरळ दहाबारा जणांची पथके घुसवून 'लांडगा-योद्धा' ठरलेला चीनसुद्धा आजकाल अनेक देशांत अनेक प्रकल्पांना सहकार्य करण्याची 'मोहक मुत्सद्देगिरी' करू लागलेला आहे. पण चीनबद्दल सावध असणेच बरे, कारण चीनचा मूड कोणत्याही वेळी सहज बदलू शकतो. बीजिंगच्या सध्याच्या सकारात्मक मुत्सद्देगिरीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे चिनी लष्करी क्षमतेचे स्वरूप. जमिनीवरील चीनच्या लष्करी वजनाच्या संदर्भातच आशियाई देशांनी पावले टाकली पाहिजेत. याउलट, भारत आणि जपानसह शेजारी राष्ट्रांच्या एकत्रित खर्चाकडे पाहून चीन स्वत:चा लष्करी खर्च वाढवत असतो, हे लपून राहिलेले नाही. चीनच्या औद्योगिक क्षेत्रासाठी वाढलेल्या पायाभूत सुविधा, गेल्या तीन दशकांतील प्रभावी लष्करी आधुनिकीकरण आणि संरक्षण संशोधन विकासाच्या कामी मोठ्या प्रमाणावर चिनी गुंतवणूक यामुळे बीजिंगचे संरक्षण उत्पादन प्रचंड प्रमाणावर पोहोचलेले आहे. उदाहरणार्थ : चीनने १९९५ ते २०२० दरम्यान ७० पाणबुड्या कार्यरत केल्या – म्हणजे वर्षाला जवळपास तीन! दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडानंतर लष्करी उत्पादनाचे एवढे प्रमाण कोणत्याही देशाचे नव्हते. भारतासारख्या मोठ्या देशांसह, चीनशेजारचा कोणताही देश चीनच्या वाढत्या संरक्षण-उत्पादनाशी आणि क्षमतेशी एकट्याने स्पर्धा करू शकत नाही, अशी स्थिती सध्या आहे. म्हणून तर, चीनचे सारेच आशियाई शेजारी गेल्या दशकभरात अमेरिकेशी सुरक्षा सहकार्य अधिकाधिक वाढवण्यासाठी तयार झाल्याचेही दिसलेले आहे. हे स्पष्ट आहे की आशियामध्ये संरक्षण-समतोल राखण्यासाठी (थोडक्यात, चीनला आटोक्यात ठेवण्यासाठी) अमेरिकेची उपस्थिती आवश्यक आहे. एक काळ असा होता जेव्हा आशियाई देश, आमचे आम्हीच स्वसंरक्षणासाठी पुरेसे आहोत, असे म्हणत होते. हे धोरण 'आशिया आशियाईंसाठीच' म्हणून ओळखले जाते. अमेरिकेसारख्या 'बाह्य शक्तीं'ना इथे येण्याचे काही कारण नाही, असाच बहुतेक आशियाई देशांचा विश्वास होता. चीन अजूनही त्याच भावनेवर खेळत आहे. म्हणूनच चीन असा युक्तिवाद करत आहे की 'बाहेरच्या लोकांनी' आशियाई शेजारी देशांसोबतच्या विवादांमध्ये हस्तक्षेप करू नये. आजही आशियातील काही देश 'आमचे आम्हीच' वर विश्वास ठेवणारे असले, तरीसुद्धा त्याचा उलटा परिणाम काय होईल हेही सर्वांना माहीत झालेले आहे. आजघडीला प्रश्न आशियातील अमेरिकन लष्करी उपस्थितीच्या राजकीय वैधतेचा नाही, तर त्याची तीव्रता आणि तग धरण्याची क्षमता यांचा आहे. पूर्व आशियातल्या संभाव्य युद्ध-क्षेत्रांमध्ये (थिएटर्समध्ये) जबरदस्त मानला जाई. पण सध्याच्या काळात, चीनची पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) हे वर्चस्व दररोज नष्ट करत आहे.

## प्रासंगिक »

### मोकळीक विसरा

***संकेत धुडकावून सत्ता राबवू नये, हा गांधीजींच्या काळात शोभणारा आग्रह. गेल्याचे ग्रेटा थुनबर्ग आणि सोनम वांगचुक यांच्या उदाहरणांतून दिसते...***

योगायोगांमधून प्रतीकात्मक अर्थ शोधण्याचा प्रयास बिनडोकच ठरतो. यंदाच्या गांधी जयंतीलाच विजयादशमीही आल्यामुळे ठिकठिकाणच्या मेळावाप्रिय नेत्यांनी रेटून केलेली भाषणे आणि त्यातून गांधीजींच्या राजकारणापासून आताच्या राजकारणाचे दिसून आलेले अंतर, हा तर निव्वळ कॅलेंडरी योगायोग होता. गांधीजींचा काळ आता उरला नाही, हे उमगण्यासाठी आजकालच्या नेत्यांची भाषणे ऐकण्याची गरज नसते. तेव्हा या योगायोगाकडे कुणाचे लक्षही गेले नसेल तर बरेच. पण गांधीजींच्या काळापासून आपण किती दूर आहोत आणि ते अंतर आता किती चिंताजनक ठरते आहे हे दाखवून देणाऱ्या घडामोडी नेमक्या यंदाच्या गांधी जयंतीला घडल्या. कर्नाळ्याजवळच्या युसुफ मेहेरअली केंद्राच्या कार्यात स्वत:ला गाडून घेणारे शतायुषी कार्यकर्ते जी. जी. पारीख याच दिवशी निवर्तले.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या दुसऱ्या कालावधीत तेथील व्यवसायात भरभराट होईल का? बहुतेक तज्ज्ञांच्या मते, टॅरिफ आणि परदेशी व्यक्तींना मायदेशी परत पाठविण्यासंदर्भात त्यांनी प्रचारादरम्यान जी आश्वासने दिली, त्याविषयी ते फारसे आग्रही राहतील, असे वाटत नाही.

# ट्रम्प खरंच स्थलांतरितांची रवानगी छावण्यांत करतील?

ही आश्वासने त्या कुंपणासारखी असतील, जे बांधल्याचे दावे केले जातात, मात्र प्रत्यक्षात ते अस्तित्वातच नसते. पण हा फुकाचा आशावाद ठरण्याची दाट शक्यता आहे. कारण ट्रम्प फार पूर्वीपासून टॅरिफ आणि स्थलांतरितांना परत पाठविण्यासंदर्भात अत्यंत आग्रही आहेत. आणि त्यांनी त्यांची ओळख असलेल्या या धोरणांची अंमलबजावणी केली नाही आणि लोकांनी त्यावरू त्यांच्याविरेधात टीकेची झोड उठविली, तर ते अंमलबजावणी करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.पण त्यांनी त्यांची ही धोरणे सौम्य केली नाहीत, अगदी निराशावादी व्यक्तीनेही कल्पिले नसेल, एवढे प्रचंड नुकसान होईल. स्थलांतरितांविरोधातील भूमिकेमुळे होणारे नुकसान दुहेरी असेल. एकीकडे अमेरिकनांना न आवडणारी अंगमेहनतीची कामे करणाऱ्या कामगारांची कमतरता भासू तर दुसरीकडे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही अमेरिका पिछाडीवर जाईल. ट्रम्प यांनी



आधीच राष्ट्रीय आणीबाणी घोषित करून अमेरिकेत मोठ्या संख्येत राहणाऱ्या बेकायदा स्थलांतरितांविरोधात लष्कर तैनात करण्याचा इशारा दिला आहे. ट्रम्प यांचे स्थलांतर धोरणासंदर्भातील मुख्य सल्लागार स्टिफन मिलर यांच्या कल्पनेतील अवाढव्य छावण्यांत या बेकायदा स्थलांतरितांना सुरुवातीच्या काळात ठेवण्यात येईल. तसे झाल्यास ते मानवी हक्क आणि नागरी स्वातंत्र्यासाठी दु:स्वप्न ठरेल. पण ट्रम्प काही अशा प्रश्नांची तमा बाळगणाऱ्यांपैकी नाहीत. टीका झालीच, तर त्याचाही त्यांना अभिमान वाटेल, कारण त्यामुळे ते अधिक मजबूत असल्याचा आभास निर्माण होईल.आर्थिक परिणाम हा वेगळा मुद्दा असेल. बहुसंख्य स्थलांतरितांना माघारी पाठविल्यास ज्या क्षेत्रांत अंगमेहनतीची कामे करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे, त्या उद्योगांशी संबंधित उत्पादनांची दरवाढ संभवते. कृषी क्षेत्र, बांधकाम क्षेत्र आणि मांसाचे पॅकिंग करण्याच्या उद्योगांवरही याचा परिणाम होऊ शकतो. हे भयंकर असेल की अतिभयंकर असेल?ट्रम्प यांच्या धोरणांचे हे झाले या नजिकच्या भविष्यातील दुष्परिणाम. त्यापलीकडील दीर्घकालीन परिणामांकडे अद्याप लक्ष वेधले गेलेले नाही. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरेल अमेरिकेच्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मक्तेदारीपुढील आव्हान. अमेरिकेचे तंत्रज्ञान क्षेत्र हे जगासाठी एक मोठे आश्चर्य आहे. जगातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्था सध्या साधारण एकाच स्तरावर असल्याचे दिसते. आज युरोपचा पर कॅपिटा जीडीपी अमेरिकेपेक्षा कमी आहे कारण तेथील कर्मचारी अमेरिकेतील कर्मचाऱ्यांपेक्षा कमी तास काम करतात. ते खऱ्या अर्थाने सुट्या घेतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ।।१।।

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ।।२।।

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

ज्ञानेश्वरी चिंतन संमेलन

## राज्यस्तरीय संमेलनाचे उद्घाटन

# ज्ञानेश्वरीच्या चिंतनातून वारकऱ्यांना ऊर्जा

## पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते उद्घाटन

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'साडेसातशे वर्षांनंतरही संत ज्ञानेश्वर माउलींच्या विचारांची ताकद आजही महाराष्ट्राला प्रेरणा देते. ज्ञानेश्वरीच्या आध्यात्मिक तेजावरच महाराष्ट्राची संस्कृती आणि वारकरी परंपरा टिकून आहे,' असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर व श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग-सामूहिक चिंतन महाप्रकल्प, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत तुकाराम भवन येथे आयोजित श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलनाचे उद्घाटन पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते झाले.**



यावेळी आमदार अभिजित पाटील, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ॲड. माधवी निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष रवींद्र पाटील, ह.भ.प. बंडा तात्या कराडकर, श्री. सहस्रबुद्धे, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत तसेच अनेक मान्यवर वारकरी व भाविक उपस्थित होते. पालकमंत्री गोरे म्हणाले, की पंढरपूर ही संतांच्या विचारांनी प्रेरित झालेली भूमी आहे. ज्ञानेश्वरीवर चिंतन करण्यासाठी राज्यभरातील अभ्यासक एकत्र येत आहेत, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. विठ्ठल-माउलींचा सेवक म्हणून मला या संमेलनात सहभागी होण्याचा आनंद आहे. आषाढी वारीतील सेवेसंदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, मंदिरे समिती व प्रशासनाने मिळून केलेल्या कामाचे कौतुक सर्वत्र होत आहे. वारकरी भाविकांनी दिलेल्या सुविधांचे मूल्यमापन केले असून त्यांचं समाधान हेच आमचं यश आहे. भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन व मंदिर समिती यांच्यातील समन्वय अधिक बळकट केला जाईल.संमेलनात रविवारी ५ ऑक्टोबर रोजी "श्री ज्ञानेश्वर महाराज अद्वितीय तत्वज्ञ" या विषयावर उल्हास घोडके, इंदुताई खेडकर, प्रा. सुदाम देवखिळे, सुचित्रा भालेराव, संजय खेले यांचा सहभाग असून, या परिसंवादाचे अध्यक्ष दिलीप धनेश्वर असणार आहेत. या नंतर श्रीमद् भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील पात्रांचा तौलनिक विचार या विषयांवर ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर यांचे व्याख्यान तर ह.भ.प. जयवंत महाराज बोधले श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित अमृतानुभव, अभय टिळक "श्री ज्ञानदेव, ज्ञानदेवी आणि भाषा व्यवहार यावर व्याख्याने देणार आहेत, अशी माहिती औसेकर महाराज यांनी दिली.यावेळी आमदार अभिजित पाटील, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ॲड. माधवी निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष रवींद्र पाटील, ह.भ.प. बंडा तात्या कराडकर, श्री. सहस्रबुद्धे, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत तसेच अनेक मान्यवर वारकरी व भाविक उपस्थित होते. पालकमंत्री गोरे म्हणाले, की पंढरपूर ही संतांच्या

### भाषा व्यवहार यावर व्याख्यान

भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन व मंदिर समिती यांच्यातील समन्वय अधिक बळकट केला जाईल. संमेलनात रविवारी ५ ऑक्टोबर रोजी "श्री ज्ञानेश्वर महाराज अद्वितीय तत्वज्ञ" या विषयावर उल्हास घोडके, संजय खेले यांचा सहभाग असून, या परिसंवादाचे अध्यक्ष दिलीप धनेश्वर असणार आहेत.ज्ञानेश्वर महाराज विरचित अमृतानुभव, अभय टिळक "श्री ज्ञानदेव, ज्ञानदेवी आणि भाषा व्यवहार यावर व्याख्याने देणार आहेत.

विचारांनी प्रेरित झालेली भूमी आहे. ज्ञानेश्वरीवर चिंतन करण्यासाठी राज्यभरातील अभ्यासक एकत्र येत आहेत, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. विठ्ठल-माउलींचा सेवक म्हणून मला या संमेलनात सहभागी होण्याचा आनंद आहे.आषाढी वारीतील सेवेसंदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, मंदिरे समिती व प्रशासनाने मिळून केलेल्या कामाचे कौतुक सर्वत्र होत आहे. वारकरी भाविकांनी दिलेल्या सुविधांचे मूल्यमापन केले असून त्यांचं समाधान हेच आमचं यश आहे. भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन व मंदिर समिती यांच्यातील समन्वय अधिक बळकट केला जाईल.संमेलनात रविवारी ५ ऑक्टोबर रोजी "श्री ज्ञानेश्वर महाराज अद्वितीय तत्वज्ञ" या विषयावर उल्हास घोडके, इंदुताई खेडकर, प्रा. सुदाम देवखिळे, सुचित्रा भालेराव, संजय खेले यांचा सहभाग असून, या परिसंवादाचे अध्यक्ष दिलीप धनेश्वर असणार आहेत. या नंतर श्रीमद् भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील पात्रांचा तौलनिक विचार या विषयांवर ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर यांचे व्याख्यान तर ह.भ.प. जयवंत महाराज बोधले श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित अमृतानुभव, अभय टिळक "श्री ज्ञानदेव, ज्ञानदेवी आणि भाषा व्यवहार यावर व्याख्याने देणार आहेत, अशी माहिती औसेकर महाराज यांनी दिली.'साडेसातशे वर्षांनंतरही संत ज्ञानेश्वर माउलींच्या विचारांची ताकद आजही महाराष्ट्राला प्रेरणा देते. ज्ञानेश्वरीच्या आध्यात्मिक तेजावरच महाराष्ट्राची संस्कृती आणि वारकरी परंपरा टिकून आहे,'पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेचिंतन महाप्रकल्प, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत तुकाराम भवन येथे आयोजित श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलनाचे उद्घाटन पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते झाले.

# शंभराव्या संमेलनापूर्वी दुबईत साहित्य संमेलन !

## साहित्य महामंडळाने आयोजकांचे निमंत्रण स्वीकारले

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**येत्या २०२७ साली होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापूर्वी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी आणि सर्व सदस्यांसह ३० साहित्यिकांना येत्या सप्टेंबर महिन्यात विश्व साहित्य संमेलनानिमित्त 'दुबईवारी' घडणार आहे.**




मराठी साहित्य महामंडळाच्या शनिवारी कुलबर्गी (गुलबर्गा) येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसमोर विश्व साहित्य संमेलनाचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्याचा तपशील महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी उपस्थित प्रतिनिधींसमोर ठेवला.त्यानुसार दुबई येथील मराठी मंडळाने वरील संमेलनाचा प्रस्ताव दिला आहे. यानिमित्ताने अन्य तीन-चार आखाती देशांतील मराठीजनांना एकत्र आणण्याचा प्रयत्न संयोजकांकडून सुरू झाला आहे.१९ प्रतिनिधी आणि ३० निमंत्रित साहित्यिकांचा प्रवास तसेच इतर खर्चाचा भार उचलण्याची तयारी संयोजकांनी दर्शविली असल्याचे वरील

### १० वर्षांपासून हा उपक्रम थांबला

२०१५ साली नांदेडचे शेषराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पोर्टब्लेअर (अंदमान) येथे संपन्न झालेल्या संमेलनानंतर मागील १० वर्षांपासून हा उपक्रम थांबला आहे.महामंडळाच्या कालच्या बैठकीतील हा सर्वात महत्त्वाचा निर्णय असल्याचे एका सदस्याने बैठकीनंतर सांगितले.

बैठकीमध्ये सांगण्यात आले. महामंडळाने हा प्रस्ताव स्वीकारला आहे. बैठकीमध्ये कोणीही विश्व साहित्य संमेलनास विरोध केला नाही. दुबईतील संस्थेचे प्रतिनिधी पुढील काळात पुण्यामध्ये येणार असून त्यानंतर नियोजित संमेलनाची रूपरेषा ठरवली जाणार आहे. साहित्य महामंडळाच्या पुढाकारातून विश्व साहित्य संमेलने भरविण्याचा उपक्रम २००९ साली सुरू झाला.

पाकिस्तानची खेळी

## थेट अमेरिकेला दिली 'ही' मोठी ऑफर

# पाकिस्तानची नवी खेळी!

## भारतावर काय परिणाम होणार?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिका आणि भारतामधील टॅरिफच्या मुद्द्यावरून संबंध ताणले गेले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मागील काही महिन्यांपासून सातत्याने भारतावर टीका करत आहेत. मात्र, दुसरीकडे अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये जवळीक वाढत असल्याचं चित्र दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी मागील काही महिन्यांत डोनाल्ड ट्रम्प यांची अनेकदा भेट घेतल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे अमेरिका-पाकिस्तानमध्ये नेमकं काय शिजतंय? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता.**



यातच आता एक मोठी माहिती समोर आली आहे. पाकिस्तानने एक मोठी चाल खेळली असून थेट अमेरिकेला अरबी समुद्रात बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर दिली असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पाकिस्तानने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे ही विनंती केली आहे. या संदर्भातील वृत्त फायनान्शियल टाईम्सच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.वृत्तानुसार, पाकिस्तान अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. यातच आता पाकिस्तानने अरबी समुद्रात बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर डोनाल्ड ट्रम्प यांना दिली आहे. हे बंदर पाकिस्तानमधील बलुचिस्तानच्या ग्वादर जिल्ह्यातील पास्नी या ठिकाणी असेल. हे बंदर भारत इराणमध्ये विकसित करत असलेल्या चाबहार बंदराजवळ असेल. सामरिकदृष्ट्या चाबहार बंदर हे इराण आणि भारत या दोन्ही देशांसाठी महत्त्वाचं आहे.

मात्र, आता पाकिस्तानने अमेरिकेला थेट बलुचिस्तानच्या ग्वादरमध्ये बंदर बांधण्याची विनंती केल्यामुळे याचा भारतावर काही परिणाम होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. समोर आलेल्या अहवालात म्हटलं आहे की पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या सल्लागारांनी १.२ अब्ज डॉलर्सपर्यंतच्या या ऑफरसह अमेरिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. तसेच अमेरिका पास्नीमधील पाकिस्तानच्या महत्त्वाच्या खनिजांपर्यंत पोहोचण्यासाठी बंदरावर एक टर्मिनल बांधेल आणि चालवेल. अशांत बलुचिस्तान प्रांतातील हे शहर अफगाणिस्तान आणि इराणच्या सीमेवर आहे.यातच आता एक मोठी माहिती समोर आली आहे. पाकिस्तानने एक मोठी चाल

## समुद्रात बंदर बांधण्याची ऑफर

टॅरिफच्या मुद्द्यावरून संबंध ताणले गेले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मागील काही महिन्यांपासून सातत्याने भारतावर टीका करत आहेत. मात्र, दुसरीकडे अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये जवळीक वाढत असल्याचं चित्र दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी मागील काही महिन्यांत डोनाल्ड ट्रम्प यांची अनेकदा भेट घेतल्याचं पाहायला मिळालं.

खेळली असून थेट अमेरिकेला अरबी समुद्रात बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर दिली असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पाकिस्तानने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे ही विनंती केली आहे. या संदर्भातील वृत्त फायनान्शियल टाईम्सच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.

वृत्तानुसार, पाकिस्तान अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. यातच आता पाकिस्तानने अरबी समुद्रात बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर डोनाल्ड ट्रम्प यांना दिली आहे. हे बंदर पाकिस्तानमधील बलुचिस्तानच्या ग्वादर जिल्ह्यातील पास्नी या ठिकाणी असेल. हे बंदर भारत इराणमध्ये विकसित करत असलेल्या चाबहार बंदराजवळ असेल. सामरिकदृष्ट्या चाबहार बंदर हे इराण आणि भारत या दोन्ही देशांसाठी महत्त्वाचं आहे. मात्र, आता पाकिस्तानने अमेरिकेला थेट बलुचिस्तानच्या ग्वादरमध्ये बंदर बांधण्याची विनंती केल्यामुळे याचा भारतावर काही परिणाम होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. समोर आलेल्या अहवालात म्हटलं आहे की पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या सल्लागारांनी १.२ अब्ज डॉलर्सपर्यंतच्या या ऑफरसह अमेरिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे.

# चेंगराचेंगरीच्या प्रकरणात विजयला अटक?

## तामिळनाडूचे मंत्री दुराई मुरुगन यांनी शनिवारी मोठं भाष्य केलं

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तमिळ अभिनेता थलपती विजय तामिळनाडूच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार तयारी करत आहे. थलपती विजय सध्या तामिळनाडूमध्ये रॅली काढत जाहीर सभा घेत आहे. मात्र, २७ सप्टेंबर रोजी करूर जिल्ह्यातील रॅलीत चेंगराचेंगरीची घटना घडली. रॅलीत मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यामुळे चेंगराचेंगरी होऊन ३८ पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला, तर शेकडो लोक गंभीर जखमी झाले.**



मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश होता. या प्रकरणात 'तमिळगा वेत्री कळघम' पक्षाच्या एका नेत्याला अटक करण्यात आली. या घटनेत गुन्हा देखील दाखल झाला असून पोलीस घटनेची चौकशी करत आहेत. मात्र, या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या प्रकरणात थलपती विजयला अटक होईल का? असाही सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत आता तामिळनाडूचे मंत्री दुराई मुरुगन यांनी शनिवारी मोठं भाष्य केलं आहे. 'जर पुरावे असतील तर

## दुराई मुरुगन काय म्हणाले?

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर सरकारवर झालेल्या टीकेबाबत बोलताना मंत्री दुराई मुरुगन यांनी म्हटलं की, "आपण या घटनेला जबाबदार कसं असू शकतो? आम्ही पोलीस संरक्षण दिलं, परवानगी दिली, अटी घातल्या आणि सल्ला दिला, म्हणून जे आमच्यावर आरोप करतात ते फक्त गॅलरीमध्ये खेळणारे राजकारणी आहेत."

सरकार आपलं कर्तव्य पार पाडेल', असं त्यांनी म्हटलं आहे. टीव्हीके प्रमुख थलपती विजयला अनावश्यकपणे अटक करणार नाही. पण जर पुरावे असतील तर सरकार त्यांचं कर्तव्य पार पाडेल. पण साधारणपणे प्रत्येक पक्षाला माहित असतं की ते आयोजित करत असलेल्या सभा किंवा बैठकांना किती लोक उपस्थित राहतील. त्यामुळे सर्वच पक्षांनी त्यांच्या अपेक्षित गर्दीसाठी योग्य ठिकाणे निवडावीत", असं मंत्री दुराई मुरुगन यांनी म्हटलं. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

# डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न करण्याचा निर्णय का घेतला?

१९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अबोध' चित्रपटातून अभिनेत्री माधुरी दीक्षितने कलाविश्वात पदार्पण केलं. बॉलीवूडमध्ये आल्यावर सुरुवातीचा काही काळ तिला प्रचंड संघर्ष करावा लागला. मात्र, त्यानंतर आलेल्या 'तेजाब'ने बॉलीवूडवर एक वेगळीच जादू केली. रातोरात माधुरी सुपरस्टार झाली. केवळ अभिनयाने नव्हे तर तिने आपल्या नृत्याने सुद्धा लाखो चाहत्यांना घायाळ केलं.'खलनायक', 'हम आपके हैं कौन', 'दिल तो पागल हैं', 'साजन' अशा एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपटांमध्ये ती झळकली. दमदार अभिनयासाठी फिल्मफेअर अवॉर्ड्स मिळवले. मात्र, १९९९ मध्ये करिअरच्या शिखरावर असताना माधुरीने लग्नबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्रीने अचानक अमेरिकेला गेल्याने तिचे लाखो चाहते नाराज झाले होते. यानंतर देखील माधुरीने काही चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. पण, हळुहळू तिने चित्रपटसृष्टीपासून दूर राहून कुटुंबीयांवर लक्ष केंद्रीत केलं.



माधुरीने याबद्दल 'गलाट्टा इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केलं आहे. "मी खूप खूश आहे कारण, भौतिक सुखापेक्षा मला माझी माणसं, माझं कुटुंब जास्त महत्त्वाचं आहे. मला अभिनय करायला आवडतो, नृत्य आवडतं... एकंदर माझ्या कामाशी संबंधित सगळ्या गोष्टी मला आवडतात. लोक मला स्टार अभिनेत्री मानतात हे माझं खरंच भाग्य आहे. पण, मला स्वत:ला याबद्दल कधीच काही वाटलं नाही. मला कधीच असं जाणवलं नाही की, अरे देवा...मी लोकांपासून आता दूर जातेय.

# आला रे आला 'सिम्बा' आला!

आगामी 'सिंघम अगेन'हा बहुचर्चित सिनेमा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता या सिनेमातील अभिनेता रणवीर सिंहचा फर्स्ट लूक आऊट झाला आहे. 'सिंघम अगेन' या सिनेमात नेहमीप्रमाणे सिंघम म्हणजेच अजय देवगनच्या ॲक्शनचा तडका पाहायला मिळणार आहे. पण या सिनेमाची स्टारकास्टदेखील खूपच तगडी आहे. 'सिंघम अगेन' या सिनेमात टायगर श्रॉफ, अक्षय कुमार, रणवीर सिंह आणि दीपिका पादुकोण या कलाकारांचाही ॲक्शन मोड पाहायला मिळणार आहे. आता या सिनेमात रणवीरचा लूक आऊट झाल्याने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. रणवीर सिंहने 'सिंघम अगेन' या सिनेमाचं पोस्टर सोशल मीडियावर शेअर केलं आहे. पोस्टरमध्ये रणवीर सिंहचा धमाकेदार लूक पाहायला मिळत आहे. वर्दीतील त्याच्या लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. पोस्टर शेअर करत रणवीरने लिहिलं आहे,"सबसे नटखट, सबसे निर्लज्ज...आला रे आला सिम्बा आला". रणवीरच्या या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. रोहित शेट्टीने 'सिंघम अगेन' या सिनेमाच्या शूटिंगदरम्यानचे फोटो शेअर केले होते. या पोस्टरमध्ये ॲक्शनचा तडका पाहायला मिळाला. हे फोटो आणि कलाकारांचे फर्स्ट लूक पाहून प्रेक्षक आता सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. 'सिंघम अगेन' हा सिनेमा 15 ऑगस्ट 2024 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.



# कुणीतरी येणार येणार गं!

संकेत भोसले आणि अभिनेत्री सुगंधा मिश्रा (SUGANDHA MISHRA) हे कपल सध्या चर्चेत आहे. या जोडप्याच्या घरी लवकरच एका चिमुकल्या पाहुणाचे आगमन होणार आहे.नुकताच सुगंधाचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला सुगंधा आणि संकेत यांच्या कुटुंबाने तसेच त्यांच्या जवळच्या मित्रमैत्रिणींनी हजेरी लावली. सुगंधाच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी सोशल मीडियावर डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोला त्यांनी कॅप्शन दिलं, "आमचा बेबी शॉवर कार्यक्रम हा महाराष्ट्रीयन पारंपारिक पद्धतीने (डोहाळे जेवण) पार पडला. ओटी भरण, पूजा आणि बर्फी पेडा कार्यक्रम इत्यादी गोष्टी पार पडल्या. तसेच केक कटिंग देखील करण्यात आलं, डायपर चेंजिंग सारखे मजेशीर खेळ देखील आम्ही खेळलो." पुढे त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं, "आम्ही एका स्पेशल गाण्यावर परफॉर्म देखील केलं. आम्ही हे गाणं आमच्या बाळासाठी लिहिलं आहे. हे गाणं सुगंधाने लिहिलेले आणि संगीतबद्ध केले आहे. तसेच हे गाणं आम्ही दोघांनी गायलं आहे. ते लवकरच आम्ही तुमच्यासोबत शेअर करू" संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. बेबीका धुर्वे,हेमंत थत्ते,गौहर खान, मुक्ती मोहन यांनी देखील संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या फोटोवर कमेंट्स केल्या.



# सारा अली खानने दाखवली केदारनाथ यात्रेची झलक!

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आहे. आपले सिनेमे आणि अभिनयाच्या माध्यमातून तिने प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन केलं आहे. व्यावसायिकसह वैयक्तिक आयुष्यातील सर्व अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करत असते. साराला फिरण्याची प्रचंड आवड आहे. त्यामुळे भटकंती करतानाचे फोटो आणि व्हिडीओ ती चाहत्यांसोबत शेअर करत असते. सारा अली खान आता केदारनाथयात्रेला पोहोचली आहे. सारा अली खानने सोशल मीडियावर केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सारा अली खान लोकल ठिकाणी जेवण करताना दिसत आहे. दरम्यान तेथील एका साधुंचे ती आशीर्वाद घेत आहे. तसेच एका नदीकिनारी ती चेहऱ्यावर पाणी मारताना पाहायला मिळत आहे. त्यावेळी ती म्हणत आहे,"सकाळी-सकाळी थंड पाणी चेहऱ्यावर मारा बुद्धी तेज होईल". एकंदरीतच सारा अली खानचा केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. साराने या व्हिडीओच्या बॅकग्राऊंडला 'केदारनाथ' सिनेमातील काफीराना गाणं लावलं आहे. सारा अली खानचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. केदारनाथ यात्रेदरम्यानचे साराचे फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरले आहेत. पण हा व्हिडीओ पाहिल्यानंतर चाहत्यांना मात्र सुशांत सिंह राजपूतची आठवण आली आहे. सारा अली खानने शेअर केलेल्या व्हिडीओवर चाहते,"ईस्ट असो वा वेस्ट सारा अली खान बेस्ट आहे, व्हा दीदी सुशांत सिंह राजपूतची आठवण आली, काफीराना गाणं ऐकल्यानंतर सुशांतची आठवण आली नाही असं होत नाही, हर हर महादेव, अशा कमेंट्स करत आहेत.

कर्णधार पद

## निर्णयाला माजी हरभजन सिंगनं व्यक्त केली निराशा

# रोहितला कॅप्टन पदावरून हटवलं

## शुबमन गिलकडे कर्णधार पद

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया विरोधात होणाऱ्या मालिकेसाठी बीसीसीआयने भारताच्या वनडे आणि टी-२० संघाची घोषणा केली आहे. यात एकदिवसीय सामन्यासाठी आता रोहित शर्माऐवजी कर्णधारपदाची धुरा शुबमन गिलकडे देण्यात आल्याचे जाहीर केले. काही दिवसांपूर्वीच गिलकडे कसोटी क्रिकेटचीही धुरा देण्यात आली होती. त्यानंतर विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. रोहित शर्माला नेतृत्वापासून दूर करण्याच्या बीसीसीआयच्या निर्णयावर सोशल मीडियावर संताप व्यक्त होत असताना आता माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगनेही यावर आश्चर्य व्यक्त केले आहे.**



### त्याला पुरेसा वेळ बाकी आहे

२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी आणखी काही वेळ बाकी आहे. त्यामुळे शुबमन गिल आणखी वर्षभराने ही जबाबदारी घेऊ शकला असता, असेही हरभजनने म्हटले. "जर तुम्ही २०२७ च्या विश्वचषकाचा विचार करत असाल तर त्याला पुरेसा वेळ बाकी आहे. शुबमन गिल अजून थोडी वाट पाहू शकला असता. कदाचित ६-७ महिने किंवा वर्षभरानंतर त्याने कर्णधार पदाची धुरा सांभाळली असती.

ऑस्ट्रेलिया विरोधात होणाऱ्या एकदिवसीय सामन्यांसाठी संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचाही समावेश करण्यात आला आहे. सात महिन्यांनंतर दोघेही क्रिकेटच्या मैदानावर एकत्र दिसणार आहेत. शुबमन गिलला कर्णधार पद देताच क्रिकेट वर्तुळात उत्साह आणि नाराजी असे संमिश्र वातावरण दिसत आहे.यावर व्यक्त होताना हरभजन सिंगने शुबमन गिलला संधी दिल्याबद्दल त्याचे कौतुक केले. "कसोटी क्रिकेटमध्ये गिलने चांगली कामगिरी केली. आता त्याच्यावर वनडेचीही जबाबदारी देण्यात आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन", असे हरजभजन सिंगने जिओ हॉटस्टारवर बोलताना म्हटले.शुबमन गिलचे कौतुक केले असले तरी रोहित शर्माला इतक्यात बाजूला केल्याबद्दल हरभजन सिंगने आश्चर्य व्यक्त केले. "रोहित शर्माचा व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये चांगला रेकॉर्ड आहे. रोहित शर्मा संघात असताना त्याला कर्णधार पदावरून बाजूला करणे हे धक्कादायक आहे", असे हरभजन सिंगने म्हटले. हरभजन सिंग पुढे म्हणाला, जर रोहित ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे तर तो कर्णधार म्हणून जाईल. त्याने नुकतीच चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इतर स्पर्धा जिंकल्या आहेत. त्यामुळे व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये खेळण्याची त्याला आणखी एक संधी दिली जाईल, असे मला वाटले होते.२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी आणखी काही वेळ बाकी आहे. त्यामुळे शुबमन गिल आणखी वर्षभराने ही जबाबदारी घेऊ शकला असता, असेही हरभजनने म्हटले. "जर तुम्ही २०२७ च्या विश्वचषकाचा विचार करत असाल तर त्याला पुरेसा वेळ बाकी आहे. शुबमन गिल अजून थोडी वाट पाहू शकला असता. कदाचित ६-७ महिने किंवा वर्षभरानंतर त्याने कर्णधार पदाची धुरा सांभाळली असती. एकूणच शुबमनसाठी मी आनंदी आहेच. पण रोहित शर्मा कर्णधार नसल्यामुळे थोडा निराश झालो आहे", अशी प्रतिक्रिया हरभजन सिंगने दिली. ऑस्ट्रेलिया विरोधात होणाऱ्या एकदिवसीय सामन्यांसाठी संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचाही समावेश करण्यात आला आहे. सात महिन्यांनंतर दोघेही क्रिकेटच्या मैदानावर एकत्र दिसणार आहेत. शुबमन गिलला कर्णधार पद देताच क्रिकेट वर्तुळात उत्साह आणि नाराजी असे संमिश्र वातावरण दिसत आहे.यावर व्यक्त होताना हरभजन सिंगने शुबमन गिलला संधी दिल्याबद्दल त्याचे कौतुक केले. "कसोटी क्रिकेटमध्ये गिलने चांगली कामगिरी केली. आता त्याच्यावर वनडेचीही जबाबदारी देण्यात आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन", असे हरजभजन सिंगने जिओ हॉटस्टारवर बोलताना म्हटले. शुबमन गिलचे कौतुक केले असले तरी रोहित शर्माला इतक्यात बाजूला केल्याबद्दल हरभजन सिंगने आश्चर्य व्यक्त केले. "रोहित शर्माचा व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये चांगला रेकॉर्ड आहे. रोहित शर्मा संघात असताना त्याला कर्णधार पदावरून बाजूला करणे हे धक्कादायक आहे", असे हरभजन सिंगने म्हटले.हरभजन सिंग पुढे म्हणाला, जर रोहित त्याने नुकतीच चॅम्पियन्स ट्रॉफी त्यामुळे व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये खेळण्याची त्याला आणखी एक संधी दिली जाईल.

# अजित आगरकरांचा मास्टरस्ट्रोक!

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडे संघ जाहीर करताना चाहत्यांना धक्का दिला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मा विराट कोहली यांनी कसोटी व टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर भारतीय क्रिकेट संक्रमणातून जात आहे. दरम्यान भविष्याचा विचार करता अनेक मोठे निर्णयही घेतले जात आहेत. त्याचा प्रत्यय ऑस्ट्रेलियाविरूद्ध मालिकेसाठी वनडे संघाच्या नेतृत्वबदलातून समोर आला. रोहितच्या जागी आता गिल वनडे संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.**



### सोशल मीडियावर चाहत्यांचा उद्रेक

जर या दोन्ही दिग्गज पुढे खेळू इच्छित असतील, तर त्यांना खेळाडू म्हणूनच सातत्याने कामगिरी करावी लागेल. रोहितकडून कर्णधारपद काढून घेणं हाच त्या दिशेने स्पष्ट संदेश आहे. कर्णधार म्हणून रोहितचा काळ अत्यंत यशस्वी राहिला आहे. रोहितचं वनडे कर्णधारपद काढून घेतलं आणि सोशल मीडियावर चाहत्यांचा उद्रेक झाला.

यादरम्यान रोहित-विराटच्या क्रिकेटमधील भविष्याबाबत निर्णय मात्र आता त्या दोघांच्या हातात नसेल.अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील वरिष्ठ निवड समितीने भारतीय क्रिकेटच्या भविष्याचा विचार करता निर्णायक आणि कठोर निर्णय घेतले आहेत. त्यातील ताजा निर्णय म्हणजे कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल याची एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती, ज्यामुळे रोहित शर्माला या भूमिकेतून बाजूला करण्यात आलं आहे.वनडे संघातील नेतृत्वबदलाचा हा निर्णय कधी ना कधी होणार होताच, पण तो इतक्या लवकर घेतला जाईल; याची कल्पना नव्हती. पुढील एकदिवसीय विश्वचषक २०२७ मध्ये खेळवला जाणार असून, त्यासाठीचा कालावधी खूप मोठा आहे. त्यामुळे सध्या ३८ वर्षीय रोहित शर्मा याच्यावर दीर्घकालीन जबाबदारी सोपवणं शक्य नव्हतं. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासाठी भारतीय क्रिकेटचं दार पूर्णपणे बंद झालेलं नाही, पण संघाचं नियंत्रण आणि पुढील दिशा ठरवण्याचा निर्णय घेणं मात्र आता त्यांच्याकडे नसेल. ऑस्ट्रेलिया वनडे क्रिकेटमधील मर्यादित संधींनंतरही खेळत राहण्याची त्यांच्यात तीव्र इच्छा आणि प्रेरणा आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 5 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## स्वाभिमानी कामगार संघटनेमुळे कामगारांच्या हक्कांचे संवर्धन

# “ट्रॅक कॉम्पोनंट” च्या कामगारांना 14 हजारांची पगारवाढ!

### आ.महेश लांडगे यांच्या उपस्थितीत चाकण औद्योगिक वसाहातीत वेतनवाढ करार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चाकण औद्योगिक वसाहातीमधील ट्रॅक कॉम्पोनंट लि. व स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यात औद्योगिक क्षेत्रातील सर्वात मोठा वेतनवाढ करार झाला. कंपनीच्या कामगारांना 14 हजार 100 रुपयांची पगारवाढ मिळाली आहे. त्यामुळे यंदा कंपनीच्या कामगारांची दिवाळी अधिक गोड होणार आहे.**




कंपनी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यामध्ये चौथ्या वेतनवाढ करार झाला. यावेळी संघटनेचे प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, रोहिदास गाडे व अध्यक्ष जीवन येळवंडे उपस्थित होते. करारावरती संघटनेच्या वतीने सरचिटणीस कृष्णा रोहोकले, सचिव रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, भट्टू पाटील, महादेव येळवंडे, प्रशांत पाडेकर, रविंद्र भालेराव, ग्रुपो अंतोलीन युनिट अध्यक्ष संजय पाटील, ग्रुप अंतोलीन सचिव महेंद्र कदम, ट्रॅक यूनिट अध्यक्ष दीपक ब-हाटे, उपाध्यक्ष मिंटू कुमार, सरचिटणीस प्रविण वाडेकर, सहचिटणीस अनिल कुंभार, खजिनदार सवाई सिंह, व्यवस्थापनाच्या वतीने कंपनीचे CEO राजेश खन्ना, प्लांट हेड गिरीश भेंडगावे, एचआर मॅनेजर अविनाश चोरमाले, जयदीप काटकर यांनी सह्या केल्या आहेत.

प्रास्ताविक एच. आर हेड अविनाश चोरमले यांनी केले. तसेच, सूत्रसंचालन पुजा थिगळे यांनी केले. खजिनदार अमृत चौधरी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. कामगारानी पेढे

#### वेतनवाढ करारातील प्रमुख मुद्दे...

एकूण पगारवाढ : 14 हजार 100 रुपये. मेडिक्लेम पॉलीसी 150000/- रुपये (एक लाख पन्नास हजार रुपये) संपूर्ण खर्च कंपनी करणा आहे. जादाची 300000 रुपयांची बफर पॉलीसी, या पॉलिसीमध्ये स्वतः पत्नी, मुले यांचा समावेश करण्यात आला आहे. मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, सुट्टया : 41, दिवाळी बोनस : 15 हजार 228 रुपये रक्कम बोनस, मासिक हजेरी बक्षीस, सेवा बक्षीस, वैयक्तिक कर्ज सुविधा, गुणवंत कामगार पुरस्कार, प्रत्येक कामगाराला प्रत्येकी १८ महिन्याचा फरक देण्यात येणार आहे.

## “गेम इंडस्ट्री” विषयावर विद्यार्थ्यांना मिळाली नवी दिशा

### शिक्षण विश्व: एमआयटी कॉलेजमध्ये “एक्सप्लोरिंग गेम इंडस्ट्री” बद्दल मार्गदर्शन

। आळंदी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील गेम फोर्ज क्लबच्या वतीने “एक्सप्लोरिंग गेम इंडस्ट्री” या विषयावर सविस्तर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



या चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून व्हर्च्युअल व्हेक्टरचे संस्थापक हरिओम जगताप यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी गेमिंग इंडस्ट्रीतील प्रगती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि करिअरच्या विविध संधी यावर सखोल माहिती दिली. गेम डिझाईन, ॲनिमेशन, प्रोग्रॅमिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्रिएटिव्ह थिंकिंग यासारख्या कौशल्यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. आपल्या अनुभवातून विविध उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमास संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी गेमिंग क्षेत्र हे वाढत्या रोजगाराच्या दृष्टीने एक महत्त्वाचे माध्यम असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. डॉ. सुनील महाजन यांनी विद्यार्थ्यांना नवकल्पनांच्या माध्यमातून या क्षेत्रात संधी निर्माण करण्याचे आवाहन केले.

या चर्चासत्राचे संयोजन प्रा. जयवंत भूमकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्रा. प्रवीण कार्ले, प्रा. मंदार परळे, प्रा. विद्या चांदगुडे, प्रा. सचिन पोंडे आणि प्रा. संतोष पंडुरे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

चर्चासत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गेमिंग इंडस्ट्रीची व्याप्ती, उद्योजकता आणि संशोधनाच्या दिशेने विचार करण्यास प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या समाप्तीला उपस्थितांनी प्रमुख वक्त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांमध्ये गेम डेव्हलपमेंटविषयी नव्याने उत्सुकता निर्माण झाली आहे.

## ' बॅटल ऑफ द एलिट्स'मधून

# विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे प्रदर्शन!

### शिक्षण विश्व: एमआयटी एसीएससीमध्ये बॅटल ऑफ द एलिट्स 2025 स्पर्धा संपन्न

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: आळंदी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आलेल्या बॅटल ऑफ द एलियट स्पर्धेमधून विद्यार्थ्यांच्या कल्पकता बुद्धिमत्ता आणि नवकल्पनांचे उत्तम प्रदर्शन दिसून आले.**



एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (डी), पुणे येथील राईफ आणि रॉ क्लबने आयोजित केलेला "बॅटल ऑफ द एलिट्स २०२५: सर्व्हायव्हल ऑफ द शार्पेस्ट" हा कार्यक्रम नुकताच महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता, कल्पकता, समस्या सोडवण्याच्या क्षमतेसह सांघिक कार्याची क्षमता समोर आणण्यासाठी तसेच निरोगी स्पर्धेला प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विविध विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकूण सहा चमूंनी सहभाग घेतला होता. प्रत्येक संघाने आपापल्या अद्वितीय कौशल्यांच्या जोरावर उत्कृष्ट सादरीकरण केले आणि स्पर्धेचे वातावरण चुरसपूर्ण आणि प्रेरणादायी बनवले.

ही स्पर्धा चार टप्प्यांमध्ये विभागलेली होती. प्रत्येक टप्पा ही एक आव्हानात्मक फेरी होती, ज्यामध्ये विद्यार्थ्यांची बौद्धिक साक्षरता, नवोन्मेष, रणनीती आखण्याची कला आणि दबावाखाली निर्णय घेण्याची क्षमता तपासण्यात आली. एलिमिनेशन फॉरमॅटमध्ये रचलेली ही स्पर्धा प्रत्येक फेरीसह अधिकच उत्कंठावर्धक होत गेली. शेवटी, डिझाईन ॲनालिटिक्स आणि सायबर सिक्युरिटी विभागाच्या चमूने बाजी मारत विजेतेपद मिळवले, तर बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि इंटरनॅशनल बिझनेस विभागाच्या चमूने उपविजेतेपदावर आपली मोहोर उमटवली.

कार्यक्रमाच्या ठळक बाबींमध्ये सहा चमूंचा सहभाग, चातुर्याने डिझाइन केलेल्या चार सर्जनशील फेऱ्या, तसेच राईफ आणि रॉ क्लबच्या प्राध्यापक सदस्यांचा सक्रिय सहभाग आणि मार्गदर्शन यांचा समावेश होता.

कार्यक्रमानंतर आयोजकांच्या वतीने बोलताना समन्वयक, राईफ आणि रॉ क्लब डॉ. हनुमंत शिंगाडे, विद्यार्थी असोसिएट डीन डॉ. सुनील महाजन, संचालक डॉ. बी.बी. वाफारे यांनी विद्यार्थ्यांच्या स्फूर्तिदायक सहभागाचे भरभरून कौतुक केले. त्यांनी अशा प्रकारच्या स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि नवकल्पनांचे बीज रोवण्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये केवळ चुरस निर्माण केली नाही, तर सहकार्य, सर्जनशीलता, विचारांची देवाणघेवाण आणि निरोगी स्पर्धेचा आदर्श देखील निर्माण केला. सहभागींप्रमाणेच प्रेक्षकांसाठीही हा एक संस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

# विद्यार्थ्यांनी केला दिघी टेकडी परिसर स्वच्छ

### शिक्षण विश्व: स्वच्छतेचा संदेश देत मास्टर माईंड ग्लोबल स्कूलचा स्तुत्य उपक्रम

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महात्मा गांधी जयंतीनिमित्त मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, दिघी येथे स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.**



शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून दिघी टेकडी परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. परिसरातील कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली. यासोबतच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगणारी घोषवाक्ये देत पोस्टर्सद्वारे जनजागृती केली. "स्वच्छता ही सेवा आहे" या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हेतू या उपक्रमामागे होता. गांधीजींच्या 'स्वच्छ भारत' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत उदाहरण निर्माण केले.

या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि पर्यावरणाविषयीची जाण वाढली असून, भविष्यात स्वच्छ आणि सुंदर परिसर राखण्यासाठी सक्रिय योगदान देण्याचा संकल्प त्यांनी केला. परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# जयाद्रीचा मर्दानी दसरा रंगला तब्बल 22तास, पालखी सोहळा!

## देवभेट, फटाक्याची अतिशबाजी तर चित्तथरारक तलवार कसरत लक्ष वेधी ठरली



**संपूर्ण राज्याचा लक्ष वेधी ठरलेला कुलस्वामी खंडोबा म्हाळसादेवी जयाद्रीचा पारंपरिक मर्दानी दसरा यंदा तब्बल बावीस तास रंगला होता गुरुवारी सायंकाळी जेजुरीगडावरून मंदिरातील खंडोबा म्हाळसादेवी यांच्या मूर्ती विधी पूर्वक ग्रामस्थ मानकरी खान्देकरी गुरव कोळी गडशी यांनी सजविलेल्या पालखीत ठेऊन मानकरी पेशवे यांच्या ईशाऱ्या नंतर पालखी सोहळा मंदिर गडकोटातून प्रस्थान होताना भविकांनी प्रचंड भंडांऱ्यांची उधळण केली तर आधुनिक आशा फाटक्याच्या अतिशबाजींनी संपूर्ण गड उजळून गेला होता.**





फोटो - विजयकुमार हरिश्चंद्रे



मंदिरकोटातुन पालखी जयाद्रीच्या सुसरटिंगी खोऱ्यात कडेपठार निघाली तर कडेपठार वरील दुसरी पालखीहि देव पालखी भेट सोहळ्या करिता मार्गस्थ झाली मध्यरात्री सव्वा दोन वाजता आरशात दोन पालख्यांचे मुख दर्शनाने सिमोलंगन सोहळा संपन्न झाला यावेळी सर्व जातीधर्माच्या लोकांनी आपला पारंपरिक आपटा लुटण्याची प्रथाही पार पडली या दरम्यान रात्रभर फटाक्यांची अतिशबाजी सुरु होती यामुळे जयाद्रीचा असामंत उजळवून गेला होता सूर्याच्या उगवत्या साक्षीने पालखी जेजुरी ग्राम प्रदक्षणा घेत पुन्हा जेजुरीगडावर निघताना ग्रामस्थांनी सडा रांगोळी च्या पायघड्या घातल्या वाजत गाजत पालखी सोहळा खांदेकरांच्या पालखी खांदा मर्दानी खेचा खेची करत अखेर शुक्रवारी सकाळी साडे सात वाजता मंदिरात पोहचला या प्रसंगी येथील लोककलावन्तानी पालखी समोर आपली कलात्मक हजेरी लावली रोजमारा वाटप नंतर मूर्ती मूळ स्थानी विराजमान करण्यात आल्या. तर पारंपरिक प्रथेनुसार जेजुरी गडावरील वजनदार ऐतिहासिक महाखंडा स्पर्धेला सुरवात झाली सुमारे बेचाळीसं किलो वजनदार तलवार खंडा एक हाताने तलवार तोलून धरण्याच्या स्पर्धेत तेरा मिनिटाहून अधिक तलवार तोलून धरण्याचा विक्रम रमेश शेरे या मानकरी युवकांने रचला तर चित्तथरारक ज्यात दाताने तलवार तोलून धरणे, तसेच तलवार फिरवणे इत्यादी कसरतीत देवसंस्थानचे कर्मचारी नितीन कुदळे याने प्रथम क्रमांक पटकवून एक्कावन हजार रुपयांचे बक्षीस मिळवले या प्रसंगी तहसीलदार राजपूत, तलवार नवसाला वाहणारे पानसे घराण्याचे वंशज औसा तालुक्याचे आमदार, आणि विश्वस्त मंडळी खान्देकरी मानकरी, माजी विश्वस्त प्रमुख सुधीर गोडशे, संदिप जगताप यावेळी उपस्तिथ होते.

यावेळी अन्नदान जेजुरी चे गणेश निकुडे, सुधीर गोडशे आणि ट्रस्ट मार्फत भाविकांनी करिता ठेवण्यात आले होते जयाद्रीच्या हा मर्दानी दसरा तब्बल बावीस तास सुरु होता यात तलवार कसरती लक्ष वेधी ठरल्या शेकडो वर्षाची दसरा परंपरा आजही सर्व जातीधर्माचे लोक येऊन साजरा करतात यांतून सामाजिक ऐक्याचे दर्शन घडते, देवसंस्थान कमिटीच्या वतीने मानकरी ग्रामस्थांना शेकडो फोटोनची वाटप केली तर मीडिया जाहिरातीवर लाखो रुपयांचा खर्च केला परंतु पूरग्रस्थांना अद्यापही मदत देऊ शकत नसल्याची खंत यावेळी माजी विश्वस्त संदिप जगताप यांनी व्यक्त केली तर मेघडंबरीत या ऐतिहासिक महा खंडां तलावरीला स्थान दिले जावे बाबत मानकरी गावकरी आणि भाजपा आमदार संजय केळकर यांच्या मागणीला देवसंस्थान सदस्य कमिटीने अखेर वाटण्याच्या अक्षदा दाखविल्या तर पानसे सरदार घराणे हतबल असल्याचे चित्र दिसून आले.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046